नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २७/०९/२०२६ ( रविवार )

---

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ०५ गोवंश जनावरांची सुटका
## पाचगाव पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन पाचगावः— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री. मयंक माधव सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र मानकर प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन पाचगाव यांच्या नेतृत्वाखाली पाचगाव पोलीसांनी अवैधरीत्या गोवंश जनावराची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांवर कारवाई करून एकुण ०२ लाख ३५ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

दिनांक २७/०९/२०२६ रोजी पाचगाव पोलीस अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गोपनिय बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी उमरेड ते नागपूर रोडवर खापरी शिवारात इंडीयन पेट्रोलपंप जवळ नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान टाटा सुपर एस वाहन क्र. एम एच—४९/ए टी—८७११ येताना दिसली. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता **१) आरोपी शेख रेयाज शेख इस्माईल कुरेशी वय ४५ वर्ष राह. मखबुल किराणा स्टोअर जवळ, सिंधीबन बडा ताजबाग औलीया नगर, उमरेड रोड नागपुर, सोबत २) शेख निसार शेख काहीर, वय ३७ वर्ष, रा. समद खान वाहीद खान याच्या घरी किरायाने, ठाकुर प्लॉट बडा ताजबाग औलीया नगर, उमरेड रोड, नागपुर** हे मिळुन आले. मालकाबाबत विचारपुस केली असता **शेख नाजीर शेख लुकमान, रा. बडा ताजबाग औलीया नगर नागपुर** अशी माहिती प्राप्त झाली. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०५ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही

चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निदर्यतेने  वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून टाटा एस वाहन क्र. एम एच–४९/ए टी–८७११ किंमती १,००,०००/– रूपये आणि ०५ गोवंश जनावरे किंमती १,३५,०००/– रूपये असा एकूण २,३५,०००/– रूपयाचा मुददेमाल जप्त केला. नमुद प्रकरणी तिनही आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन पाचगाव येथे कलम ११(१), (ड), (ई), (एफ) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, ५ (अ), ९ महा पशु सरक्षण अधि १९७६, सहकलम ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १ व २ यांना अटक करण्यात आली आहे.**



## दारूच्या नशेत भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने वाहन चालवुन सदोष मनुष्यवध करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन काटोल :—** दिनांक २६/०९/२०२६ रोजी काटोल पोलीस स्टेशन येथे फिर्यादी गजानन विष्णु काकड, वय ३० वर्ष, रा. गारगुंडी, पोस्ट मेहुणाराजा, ता. देउळगाव राजा यांनी फिर्याद दिली की, दिनांक २५/०९/२०२६ रोजी तांदुळवाणी शिवार येथे फिर्यादीचा भाऊ मृतक हा त्याचे मोटारसायकल क्र. एम एच—०२/डि ,एच ३७४३ नी मुलगा व पत्नीसह कारंजा वरून काटोल येथे मुर्ति मार्गे जात असता तांदुळवाणी शिवरामध्ये समोरून येणारे किया कार क्र. एम एच २७/डि यु ५५९७ च्या चालकाने दारू पिवुन दारूचे नशेत त्याचे ताब्यात असलेले वाहन निष्काळजीपणे, भरधाव वेगाने व बेदरकारपणे चालवुन फिर्यादीचे भाऊ मृतक याचे मोटार सायकलला समोरून ठोस मारून गंभीर जखमी होवुन मरण पावला. आरोपी राम नारायण विश्वकर्मा, रा. अमरावती याला दारूच्या नशेत वाहन चालविल्याने अपघात होवुन मृत्यु होवु शकतो हे माहीती असतांना सुद्धा त्याने त्याच्या ताब्यातील वाहन दारूच्या नशेत भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने चालविल्याने सदर अपघात होवुन फिर्यादीच्या भावाचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन काटोल येथे आरोपी वाहन चालकाविरूद्ध कलम १०५, २८१, १२५(ब), १२५ (अ) भान्यासं, सहकलम १८५ मोटर वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## प्रतिबंधात्मक हद्दपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यावर भिवापूर पोलिसांची कारवाई

**पोलीस स्टेशन भिवापूर:—** नागपुर ग्रामीण पोलीसांनी गणेश विसर्जन कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आरोपी प्रज्वल गजानन गोडे, वय ३० वर्ष, रा. मेंढा तालुका भिवापूर याचे वर कलम १६३(२) अन्वये प्रतिबंधात्मक हद्दपार कारवाई केली होती. सदर आदेशानुसार नमुद आरोपीला हद्दीत येण्यास प्रतिबंध करण्यात आला होता.

सदर प्रतिबंधात्मक आदेशाची माहिती असतानाही आरोपी **प्रज्वल गजानन गोडे, वय ३० वर्ष, रा. मेंढा, ता. भिवापुर** यानी आदेशाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्याच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी कलम २२३ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## पोस्टे भिवापूर हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन भिवापूर :—** दिनांक २६/०९/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, आंभोरा रोड, जुने कोर्टाचे मागे भिवापूर येथे राजकुमार श्रीराम टिकरिया हा काही लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आंभोरा रोड, जुने कोर्टाचे मागे भिवापूर येथे आरोपी नामे राजकुमार श्रीराम टिकरिया, वय ४४ वर्ष, रा. वार्ड नं ०३, इंदिरा नगर भिवापूर हा कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आला. पोलीसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम २४०/— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहित्य, एक ॲन्ड्रॉईड मोबाईल असा एकुण ५२४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपी राजकुमार श्रीराम टिकरिया, वय ४४ वर्ष, रा. वार्ड नं ०३, इंदिरा नगर भिवापूर याच्या विरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन काटोल :—** दिनांक २६/०९/२०२६ रोजी काटोल पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता आरोपी नामे निखिल नामदेव खोडके, वय २८ वर्ष, रा. दिग्रस, बु ता. काटोल हा मौजा पठार येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी संशयास्पदरीत्या फिरतांना मिळुन आला. सदर इसमास त्याचे नाव व गाव विचारले असता त्यांनी उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर १३ गुन्हे दाखल,

**दिनांक २६/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण १३ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे अशोक किसनाजी भारसाखरे, वय ४५ वर्ष, रा. मोवाड वार्ड, ता. नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी मधुकर नथुजी कातलाम रा आनंतसावळी ता काटोल जि नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** अंतर्गत आरोपी नामे राजेश रामदास कोडापे, वय २८ वर्ष, रा. अडेगाव, ता. मौदा, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत** महिला आरोपी **हिचेवर** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत आरोपी नामे १)** जनार्धन निलकंठ चावटकर, वय ४६ वर्ष, रा. मोहगाव वार्ड नंबर ०४, बौध्द विहार जवळ तालुका कुही, जिल्हा नागपुर ह. मु नवीन वस्ती बुट्‌टीबोरी २) विष्णु हरी बगाडे, वय ७१ वर्ष, रा. वार्ड नंबर ०४, हनुमान नगर बुटीबोरी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत** आरोपी नामे १) मोरेश्वर माधोराव बरवड, वय ४५ वर्ष, रा. इंदीरा नगर झोपडपटटी वार्ड क्र. ५, धापेवाडा ता. कळमेश्वर २) महिला आरोपी यांचेवर ०१ गुन्हा नोंद. **तसेच आरोपी** वनराज रामाजी नागपुरे, वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र. २, धापेवाडा ता. कळमेश्वर याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन मोहपा अंतर्गत आरोपी** राजकुमार फंदीलाल मालवी, वय ३२ वर्ष, रा. पीपरीया कला, ता. बिछुवा , जि. छिंदवाडा मध्यप्रदेश, ह. मु. चामल धोटे याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा अंतर्गत आरोपी** सुनिल अनिल शेडके, वय ३९ वर्ष, रा. खापा, ता. सावनेर, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही अंतर्गत** महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत** आरोपी हनुमान यशवंत नैताम, वय २८ वर्ष, रा. बेसुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत** आरोपी प्रज्वल मधुकर देशभ्रतार, वय वर्ष, रा. टेकाडी वार्ड नं. ०४, कन्हान याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ३३४८० मिली देशी दारू, १७ लिटर मोहाफुल दारू, इतर साहित्य असा एकुण ३१,५८०/— रूपयांचा मुद्‌देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्‌देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर